महत्त्वाचे

उद्या मोफत कर्करोग तपासणी शिबीर

औरंगाबाद - आसरा संस्था, शासकीय कर्करोग रुग्णालय आणि मराठवाडा सांस्कृतिक मंडळातर्फे ५० वर्षांवरील नागरिकांसाठी शनिवारी (दि. १९) सकाळी १० ते दुपारी १ वाजेदरम्यान मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, खडकेश्वर येथे मोफत कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्व प्रकारच्या कर्करोगाची तपासणी करण्यात येणार आहे. महिलांसाठी 'मॅमोग्राफी', हाडांचा ठिसूळपणा (बोन डेन्सिटी) व इतर तपासण्या करण्यात येतील. तपासण्यासोबतच आहारविषयक सल्लाही दिला जाणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आसरा संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ पातूरकर यांनी केले आहे.

कामगारांचा मोर्चा

औरंगाबाद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरातील निवासस्थानावर शनिवारी (दि.१९) बांधकाम कामगारांचा राज्यव्यापी धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी पडून आहे; परंतु कामगारांची नोंदणीच करून घेतली जात नसल्यामुळे या निधीचा वापर होत नाही. कामगार नोंदणी त्वरित करावी, त्यासाठी संबंधित कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, नोंदणी झालेल्या कामगारांना कायद्यानुसार लाभ द्यावेत आदी मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे, असे डॉ. शंकर पुजारी, उपाध्यक्ष मधुकर खिल्लारे, संजय मंडवधरे, उदय चौधरी यांनी कळविले आहे.

मुख्याध्यापक संभ्रमात : फेब्रुवारीमध्ये सुधारित परीक्षा

परीक्षा परिषदेने मोडला कायदा

विजय सरवदे ● औरंगाबाद

वर्षभराच्या खंडानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात सुधारित शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा मुहूर्त साधला असला तरी 'सीबीएसई' व 'आयसीएसई' या अभ्यास मंडळांच्या पात्र विद्यार्थ्यांना मात्र शिष्यवृत्तीची रक्कम न देता केवळ प्रमाणपत्रांवरच त्यांची बोळवण करण्याचा दुजाभाव राज्य परीक्षा परिषदेने केला आहे. दुसरीकडे, शिक्षण हक्क कायदा अमलात आला असतानाही परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्याचा वादग्रस्त निर्णय राज्य परीक्षा परिषदेने घेतला आहे. या निर्णयावर नाराजीचा सूर उमटला आहे.

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १९५५ पासून शिष्यवृत्तीची परीक्षा घेतली जाते. या परीक्षेसाठी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा लक्षात घेता परीक्षा परिषदेने गेल्या वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर बदलण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यंदा ही परीक्षा स्थगित केली. या परीक्षेसाठी सुधारित निर्णयानुसार ४ थी ऐवजी ५ वीचे विद्यार्थी, तर ७ वी ऐवजी ८ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. राज्य मंडळाप्रमाणे 'सीबीएसई' व 'आयसीएसई' या अभ्यास मंडळाच्या शाळांतील विद्यार्थ्यांनाही ही परीक्षा देण्यास मुभा आहे; पण राज्य मंडळाच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. दुसरीकडे, 'सीबीएसई' आणि 'आयसीएसई'च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी गुणवत्तेनुसार पहिल्या ५०विद्यार्थ्यांना केवळ प्रमाणपत्र दिले जाईल. त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाणार नाही, असे स्पष्टपणे राज्य परीक्षा परिषदेने शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले आहे.

परीक्षा परिषदेचा असा निर्णय असेल, तर 'सीबीएसई' तसेच 'आयसीएसई'च्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा कशासाठी द्यावी, असा प्रश्न शहरातील अनेक शाळांच्या शिक्षकांनी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, ही परीक्षा देण्यासाठी शाळांना अगोदर परीक्षा परिषदेकडे ४०० रुपयांचे शुल्क भरून संलग्न व्हावे लागेल. त्यानंतर मग, संबंधित मुख्याध्यापकांनी परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारून 'ऑनलाईन रजिस्ट्रेशन' करावे लागेल.

या मुद्यावर जिल्हा परिषद मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष हाशम शहा यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले की, शाळा संलग्नीकरणासाठी मुख्याध्यापकांना ४०० रुपये शुल्क हे स्वत:च्या खिशातून भरावे लागेल. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्युत व्यवस्था नाही. इंटरनेटची सुविधा नाही. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मुख्याध्यापकांना 'सायबर कॅफे'वर जावे लागेल. त्यासाठी तिथे प्रती विद्यार्थी १० ते १५ रुपये खर्च कोणी करायचा.

फेरविचार करावा

◆ जिल्हा परिषद मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष हाशम शहा म्हणाले की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायद्याचा भंग केला आहे. हा कायदा बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे प्रतिबिंबित करतो; पण परीक्षा परिषदेने विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शुल्क आकारले आहे. परीक्षा परिषदेने विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा तसेच ग्रामीण भागातील शाळांच्या सुविधांचा फेरविचार करावा, अशी मागणी हाशम शहा यांनी केली आहे.

हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

Aurangabad Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
11 Dec 2016

In association with SAFFRON LANDMARKS

Powered by MKJ CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME

'लोकमत तर्फे आयोजित औरंगाबाद मॅरेथॉन स्पर्धेत आम्ही सर्व एकत्र सहभागी होणार असून, आरोग्याच्या दृष्टीने हा चांगला उपक्रम शहरात होत आहे. आम्ही सर्व जण औरंगाबाद शहराच्या औद्योगिक विकासासाठी या मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेत आहोत.

-राहुल पगारिया (संचालक- पगारिया ऑटो)

औरंगाबाद जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशन- संलग्न सर्व क्रीडा संघटना... (डावीकडून) मनोज कानोडजे, श्रीनिवास मोतियाळे, अभय देशमुख, सुरेश मीरकर, गोविंद शर्मा, दयानंद कांबळे, विनोद नरवडे, पंकज भारसाखळे, लक्ष्मीकांत खिची, भिकन अंबे, मनजितसिंग दरोगा, लता कलवार, अमोल थोरात, योगेश गायसमुद्रे, हेमेंद्र पटेल.

Co-Sponsors: RAJURI STEEL, SARA, श्री धनेश्वरी, VANSH GROUP

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing pvt.ltd | Partner

नाव नोंदणी व सहभागासाठी www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

पगारिया ऑटो... (डावीकडून) सचिन भालेराव, फईम शेख, तात्यासाहेब कसाळ, विक्की साळवे, संदीपक विधाटे, शिवराज सोळुंके, संपयती सुतार, प्रतिमा ससाने, किशोर गोरे, अनिल शिंगाणे, राहुल पगारिया (कार्यकारी संचालक), मनोज भट्ट, सऊद शेख, अली नवाज, सागर गौर, अक्रम खान, सोहेल खान, जगमितसिंग ओबेरॉय.

महाराष्ट्र प्रशासकीय लवादाचे (मॅट) सादरकर्ता अधिकारी... माधव गुडे, नंदकुमार यादव, विश्वनाथ भूमकर, शिवाजी शिर्से, इंद्रजित थोरात, मिलिंद महाजन (मुख्य सादरकर्ता अधिकारी), दीपक पाटील, प्रिया भारसवाडकर, रेषा देशमुख, संजीवनी घाटे.

तरुणांच्या भवितव्यावर राष्ट्र अवलंबून

बाबा आढाव : संविधान अभ्यासक्रमाचे उद्घाटन

औरंगाबाद : तरुण मुलात शिकून बेकारी वाढली आहे, त्याचे सरकारकडे काय उत्तर आहे. जातीय तेढ वाढविण्यापेक्षा प्रत्येक माणसाला मोफत शिक्षण का देऊ नये, असा सवाल उपस्थित करून कोणतेही राष्ट्र तरुणांच्या भवितव्यावर अवलंबून असते, असे प्रतिपादन समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी केले. बापू-सुधा काळदाते प्रतिष्ठान आयोजित भारतीय संविधान अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते एमजीएमच्या आईन्सटाईन सभागृहात बोलत होते. ॲड. मनोहरराव घुमारे अध्यक्षस्थानी, तर एमजीएमचे संचालक अंकुश कदम, प्राचार्य प्रताप बोराडे यांची विचार मंचावर उपस्थिती होती.

मराठा क्रांती मूकमोर्चा व बहुजन मुक्ती क्रांती मोर्चावर मत मांडतांना ते म्हणाले की, जातवार युवकांना एकत्र करून रस्त्यावर उतरविण्यामागचा विचार काय आहे. हे मोर्चे मूक नाहीत, तर त्यातील तरुणी अगदी चांगल्या पद्धतीने मुद्दे घेऊन बोलू लागल्या आहेत. त्यामुळे त्यांना मूक नव्हे तर बोलके मोर्चे म्हणावे लागेल. युवकातील अनेक प्रश्नांची साचलेली खदखद मोर्चातून रस्त्यावर आली आहे. हे सुजाण मंडळींनी समजून घेतले पाहिजे. उसावर तडजोड केली जाते, मग, टोमॅटो,कोंथिबीर आदींवर का बोलले जात नाही. केवळ खाजगीकरणाला खतपाणी घातल्यामुळे विषमता निर्माण झाली व त्यातून नोटा व काळा पैसा पुढे आला.

समाजवादी चळवळ, पुरोगामी विचार आणि समाजातील मागासलेपणावर चौफेर समाचार त्यांनी घेतला. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे दु:ख आणि जाती-जातीतील तेढ ही नष्ट करणे गरजेचे असल्यावर बाबा आढाव यांनी जोर दिला.

संविधानाचे वर्ग चालविताना फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा आवश्य जतन करावी. संविधानाचे मूल्य समजावून सांगावीत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. 'सत्य धर्माचे आधी घर, सर्व धर्माचे माहेर, सत्य सुखाचा आधार, बाकी सर्व अंधकार' ही कविता सर्वांकडून एका सुरात वदवून घेत शेवटी त्यांनी 'सत्यमेव जयते', अशी घोषणा दिली.

आशा देशपांडे यांनी सूत्रसंचालन तर विजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अण्णासाहेब खंदारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. साधना गायकवाड यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमास शहरातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती वडणे यांचा शपथविधी

औरंगाबाद : मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती कालिदास लक्ष्मणराव वडणे यांचा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून गुरुवारी (दि. १७) सकाळी औरंगाबाद खंडपीठात शपथविधी पार पडला. औरंगाबाद खंडपीठातील ज्येष्ठतम न्यायमूर्ती रवींद्र एम. बोर्डे यांनी न्यायमूर्ती वडणे यांना शपथ दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस खंडपीठाचे प्रबंधक (प्रशासन) एच.ए. पाटील यांनी राष्ट्रपतींच्या नोटिफिकेशनचे वाचन केले. नंतर राज्यपाल विद्यासागर राव यांच्या आदेशाचे आणि वॉरंटचे वाचन केले. तद्नंतर न्या. बोर्डे यांनी न्या. वडणे यांना शपथ दिली.

प्रामाणिक असाल तरच संशोधन शक्य!

विद्यापीठ : इन्स्पायर शिबिराला सुरुवात; शोधवृत्ती वाढीस लागण्यासाठी प्रयत्न

औरंगाबाद : संशोधनात प्रामाणिकपणा अतिशय महत्त्वाचा आहे. अप्रामाणिक माणूस संशोधन करून शास्त्रज्ञ बनूच शकत नाही. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने प्रामाणिक प्रयत्न केल्यास सर्व गोष्टी शक्य आहेत. प्रामाणिक प्रयत्न असतील तर संशोधनात अपयश येत नसल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळेचे संचालक डॉ. डी. के. आस्वाल यांनी गुरुवारी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इन्स्पायर शिबिराचे उद्घाटन डॉ. डी.के.आस्वाल यांच्या हस्ते गुरुवारी झाले. डॉ.महेंद्र सिरसाट अध्यक्षस्थानी होते.

डॉ.भारती प्रकाश, डॉ.अशोक गिरी,डॉ. विक्रम खिल्लारे, ज्योती जोशी,समन्वयक डॉ. गुलाब खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शालेय व महाविद्यालयीन जीवनात संशोधनाची गोडी लागण्यासाठी विज्ञानामध्ये आवड निर्माण झाली पाहिजे. त्याशिवाय संशोधनात अचूक व तंतोतंतपणा येत नसल्याचे डॉ.आस्वाल यांनी सांगितले. पुण्यातील नॅशनल केमिकल लॅब्रोटरीचे संचालक डॉ. अशोक गिरी यांनी ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी आर्थिक अडचणींवर मात करत संशोधनात योगदान देण्यासाठी मार्ग काढत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. सिरसाट यांनी आजच्या युगातील संशोधन पद्धतींचा विकास विद्यार्थ्यांसमोर मांडला. डॉ. गुलाब खेडकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गुणवंती आरक यांनी सूत्रसंचालन तर आभार डॉ. अनिता टिकनाईक यांनी मानले.

निरुत्साही प्रशासन

दहावीतील गुणवंत, ११ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी निवासी शिबिरात सहभागी झाले आहेत. या विद्यार्थ्यांना विविध विभाग, उपकरणे आदी जाणून घ्यायची आहेत. पाच दिवस हे विद्यार्थी विद्यापीठातच निवास करणार आहेत. या बाल मनाच्या विद्यार्थ्यांकडे मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. कुलगुरु दिल्लीमध्ये असल्यामुळे विद्यापीठ प्रशासनातील बीसीयूडी संचालक, कुलसचिव, विद्यार्थी कल्याण संचालक या अधिकाऱ्यांनी शिबिरास साधी भेटही दिली नसल्याचे समजते. यामुळे उत्साही विद्यार्थ्यांना निरुत्साही प्रशासन मिळाल्याची प्रतिक्रिया उमटली.

विज्ञान वर्धिनीने दिले जीवनाचे धडे

औरंगाबादमधील टीचर्स एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वर्धिनी हायस्कूलचा शुक्रवारी १८ नोव्हेंबर रोजी सुवर्णमहोत्सवी सोहळा साजरा होत आहे. यानिमित्त हा विशेष लेख.

एके दिवशी संध्याकाळी अचानक फोन आला. फोनवरचा आवाज तसा अनोळखीच होता. फोन उचलताच आपण मुरुगकर मॅडम का? अशी विचारणा केली. मीदेखील काही विचारणा न करता लगेच, हो मी मुरुगकर मॅडम बोलतेय, असे उत्तर दिले. तेव्हा मी भालचंद्र कुलकर्णी बोलतोय. आपण विज्ञान वर्धिनी हायस्कूलमध्ये होतो. आपल्या १९७१च्या बॅचचे 'गेट टुगेदर' ठरले आहे. तू नक्की ये. हे ऐकून ४५ वर्षांपूर्वीच्या माझ्या शाळेचा संपूर्ण पट डोळ्यासमोर आला. जुन्या आठवणी ताज्या झाल्या. बघता बघता माझ्या शाळेने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. काळ कसा झपाट्याने निघून जातो, हे कळतही नाही.

माझ्या शाळेची स्थापना १९६७ साली झाली होती. स्वर्गीय नारायण मुकुंद उजळंबकर हे शाळेचे संस्थापक. स्वर्गीय जोशी सर, स्वर्गीय तळणीकर सर, स्वर्गीय लालसरे सर, स्वामी सर याच पाच पांडवांनी उजळंबकर सरांना चांगलीच साथ दिली होती. अथक परिश्रम घेत या शिक्षकांनी शाळा नावारुपाला आणली. सुरुवातीला देवडी बाजार येथील एका लहानशा इमारतीत आमची शाळा सुरु झाली. इमारत लहान असली तरी ती विद्येच्या राजवाड्यालाही लाजवणारी होती. ९ वीमध्ये मी या शाळेत प्रवेश घेतला. शाळेत नवीन व वर्गात एकमेव विद्यार्थिनी असल्यामुळे सुरुवातीला काही दिवस बुजल्यासारखे वाटले; पण शाळेची शिस्त एवढी होती की मला कधीच कोणी त्रास दिला नाही. प्रत्येक विषयाचे शिक्षक शिकवताना विद्यार्थ्यांसोबत रममाण होत असत. हसत खेळत विषयांची गोडी लावणारे शिक्षक सारे. स्वत: उजळंबकर सर आणि टाकळकर सरांनी माझ्यात इंग्रजी विषयाची गोडी निर्माण केली. स्वामी सर व जोशी सरांनी गणित विषय आवडीचा केला. हिंदी विषय शिकविणारे कुलकर्णी सर तर ऑफ तासाला येत व वेगवेगळ्या पुस्तकांतील गोष्टी सांगत. त्यांनी वाचनाची आवड लावली. निबंध कसे लिहावे, हे शिकविले. रसायनशास्त्राची सूत्रे शिकवण्यात स्वर्गीय जी.एस. कुलकर्णी सरांचा हातखंडा होता.

सुषमा बडवे ही माझी शाळेतील जीवाभावाची मैत्रीण. ती तिच्या वर्गात एकटी आणि मी माझ्या वर्गात एकटीच विद्यार्थिनी. त्यामुळे आम्हा दोघींची खूप चांगली मैत्री होती. आज मागे वळून पाहताना वाटते की, याच शाळेने माझ्या जीवनाचा पाया मजबूत बनवला. याच शाळेने माझ्यावर उत्तम संस्कार केले. त्यामुळेच आज मी जीवनात यशस्वी झाले. २८ वर्षे इंग्रजीची शिक्षिका आणि एक आदर्श शिक्षिका म्हणून सन्मानित झाले. हे सारे श्रेय माझ्या शाळेचे आहे. अशा या माझ्या शाळेला शतश: प्रणाम!

-चित्रा मुरुगकर

प्रासंगिक

बंद एटीएमसमोर काँग्रेसची गांधीगिरी

औरंगाबाद : शहरातील बंद असलेल्या एटीएमला पुष्पहार घालून काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाने गांधीगिरी केली व नागरिकांना पाणी उपलब्ध करून देऊन डिपॉझिट स्लीप भरून देण्यास मदत केली. शहराध्यक्ष बाबा तायडे यांच्या नेतृत्वाखाली हे अनोखे आंदोलन करण्यात आले. शहागंजातील स्टेट बँकेसमोर रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याचे पाऊच वाटप करण्यात आल्या. या कामी विजयकुमार हिवराळे, जयपाल दवणे, प्रशांत अंभोरे, विशाल इंगळे, योगेश थोरात, उत्तम दणके, हरचरणसिंग गुलाटी, राबीन बत्तीसे, किशोर ढेपे, रमाकांत मगरे, दगडू खडसन, सिद्धार्थ नेतने, कैलास जाधव, मनोज आव्हाड व अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

वाणिज्य वार्ता

एम.के. कन्स्ट्रक्शनचा स्मार्ट प्रकल्प

औरंगाबाद : औरंगाबादकरांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एम. के. कन्स्ट्रक्शनने क्लासिक सिटी इम्पिरियल हा प्रकल्प आणला आहे. गट नं. १४० गंगापूर जहाँगीर, वरुड काझी (शेंद्रा बन) येथे अतिशय वाजवी दरात सर्व सोयीसुविधायुक्त बंगलो, फ्लॅट, शॉप ग्राहकांसाठी उपलब्ध केले आहे.

हा प्रकल्प जिल्हाधिकारी मान्यता प्राप्त एन-४४ चा आहे. ४ बीएचके बंगलोत प्रायव्हेट स्वीमिंगपूल व फ्लॅटधारकांसाठी कॉमन स्वीमिंगपूल असेल. या शिवाय मिनी जीम, पूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, क्लब हाऊस आदी सुविधाही येथे असणार आहेत. स्मार्ट औरंगाबादमध्ये आकारास येणारा क्लासिक सिटी इम्पिरियल या स्मार्ट प्रोजेक्टची अधिक माहिती घेण्यासाठी ऑफिस क्र. सी-१, ई-विंग, भारत बाजार, प्रोझोन मॉलच्या बाजूला, येथे संपर्क साधावा.

डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यशस्वी झालेले डीएफसीच्या स्थानिक शाखेतील विद्यार्थी.

डीएफसीचे १०८ विद्यार्थी चमकले

औरंगाबाद : डॉ. होमी भाभा यंग सायंटिस्ट अवॉर्ड या स्पर्धा परीक्षेत ज्ञानदीप फाऊंडेशन सेंटरच्या १०८ विद्यार्थ्यांनी यश मिळविले. या विद्यार्थ्यांनी डीएफसीचा गुणात्मक आणि संख्यात्मक दर्जा सिद्ध करून मराठवाड्याच्या नावाला ज्ञान क्षितिजावर मोठा सन्मान प्राप्त करून दिला आहे.

औरंगाबाद शाखेतील इयत्ता ६ वीतून राज बागवे, कादरी सय्यद अब्दुल अझीझ, सय्यद मोहंमद इद्रीस, अमेय कुलकर्णी, प्रणव नानकर आदी. इयत्ता ९ वीतून श्रीकांत भराडिया, प्रसाद कुलकर्णी, ऐश्वर्या आघाव, वेदांत गुळवे, उत्कर्ष झंवर आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्व १०८ विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. भविष्यातील शैक्षणिक व करिअर संबंधित यशासाठी या परीक्षेतील यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत संस्थेच्या संचालिका शीतल काबरा, गोविंद काबरा व प्रदीप सोमाणी यांनी केले.

बळीसेवा कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन करताना विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे. याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

बळीसेवा कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

औरंगाबाद : बीड बायपास येथील जाबिंदा लॉन्सवर आयोजित बळीसेवा कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते बुधवारी (दि.१६) करण्यात आले. विभागीय आयुक्त उमाकांत दांगट अध्यक्षस्थानी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांची उपस्थिती होती.

गिरीयोग मीडिया ॲण्ड इव्हेंटचे संचालक योगेश आवाळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी विवेक देशपांडे, राजेंद्रसिंह जाबिंदा, नरेंद्रसिंह जाबिंदा, राजेंद्र जंजाळ, एल. व्ही. आवाळे उपस्थित होते. यावेळी हरिभाऊ बागडे यांनी मार्गदर्शन केले.

SOMETHING TO DO SATURDAYS
BUTTON ART
Young artists will Design their own T-shirts, Greeting Cards or Photo Frames.

Age : 4-7yrs | Time : 5-6 pm | Fee : Only ₹350/-
Children must carry plain colour tshirts of their own size. Rest all material to be provided.
Pre registrations must.
The Yellow door
For Details Call : 9527752800
Lokmat Bhavan, Jalna Road, Aurangabad
Note: Entry from rear gate The yellow door aurangabad